माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये
## प्राप्त झालेली तक्रार
## तक्रार क्रमांक : ४४/२०१७

तक्रारकर्ता, श्री.विनायक कात्रे,
मु.पो.व्याळा, ता.बाळापुर, जि.अकोला

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक,
अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, टोपेनगर, ता.जि.अमरावती

प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,
अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, टोपेनगर, ता.जि.अमरावती

तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : १५.०६.२०२३

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| २८.०७.२०१६ | | ०३.०३.२०१७ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र.१०८९/२०१४ दि. २८.०७.२०१६ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीवर दिनांक १५.०६.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.सोनाली देशमुख व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अतुल खोडे हे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसारआयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील (अपील क्र. १०८९/२०१४) मध्ये दिनांक २८.०७.२०१६ रोजी सुनावणी घेवून "विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अर्जदार यांना त्यांचा मुळ अर्ज दि.०२.१२.२०१३ मधील मुद्या क्र.२ ची माहिती हे आदेश मिळाल्यापासून ३० दिवसामध्ये विनामूल्य द्यावी व आयोगास अनुपालन अहवाल सादर करावा." असे आदेश पारित केले होते.



राज्य माहिती आयोग यांचे ... अमरावती विभाग, अमरावती

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेला खुलासा व तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, द्वितीय अपील क्र.१०८९/२०१४ यात दि.२८.०७.२०१६ रोजी पारित केलेल्या आदेशात वरील प्रमाणे निर्देश देण्यात आले होते. याबाबत दिशाभूल करणारे उत्तर दिले असून व चुकीची माहिती दिल्यामुळे शास्ती तसेच कलम १८ पोट कलम २ व ३ नूसार न्यायोचित चौकशीचे आदेश पारित करण्याची आग्रही मागणी श्री.कात्रे यांनी त्यांचे तक्रार अर्जात तसेच लेखी युक्तीवादात केली असून म्हाडा च्या वतीने त्यांना सादर करण्यात आलेल्या नियम व नियमावली ही अर्धवट असून त्यात तक्रारकर्ता यांचा मुळ मुद्दा हा अनुत्तरीत असून पात्र व अपात्र उमेदवारांच्या यादी विषयी तसेच ऐखादा अर्जदार चुकीची माहिती सादर करुन म्हाडाची सदनिका प्राप्त करुन घेत असल्यास अशा व्यक्तींची सदनिका रद्द करण्याबाबत कुठलीच प्रक्रिया वा कुठलाच तपशील त्यात उपलब्ध नसल्याचे तक्रारकर्ता यांनी नमूद केले आहे. यावरुन विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी याबाबत तक्रारकर्ता यांचे दि.२८.०७.२०१६ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुषंगाने कलम २ (च) नूसार पात्र व अपात्र उमेदवार बाबत उपलब्ध असलेले सर्व कागदपत्रे अपिलार्थीस प्रदान करण्यात आले असून, आयोगाने प्रदान केलेल्या आदेशाचे अनुपालन झालेले आहे. त्यामुळे प्रस्तुत तक्रार अर्ज खारिज करण्यात यावा, अशी विनंती केलेली आहे. यावरुन तक्रारकर्ता यांचे म्हणण्यानूसार ज्याप्रमाणे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ (म्हाडा) यांनी अपात्र अर्जदारा विषयी कार्यवाही करण्याबाबत जी पध्दत अवलंबली आहे तशी पध्दत निश्चीत करण्याबाबत आयोगाने आदेश जारी केले असून त्याचे अनुपालन झालेले नाही. प्रस्तुत तक्रार अर्ज व अपील आदेशाचे अवलोकन केले असता, तक्रारकर्ता यांचे मुळ माहिती अर्जाचे अनुषंगाने कलम २ (च) अन्वये उपलब्ध व देय असलेली माहिती विहीत मुदतीत देण्यात आली असून प्रथम अपील अर्जावर देखील विहीत मुदतीत सुनावणी घेण्यात आलेली आहे व उपलब्ध असलेली माहिती प्रदान करण्यात आलेली आहे. तक्रारकर्ता यांचे अपेक्षेप्रमाणे खुलासा सादर करण्याची तरतुद ही माहिती अधिकारामध्ये नाही. उपलब्ध माहिती देण्यात आली असल्यामुळे व दि.१०.०३.२०१४ रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जावर अधिक कार्यवाही करण्याचे आवश्यक नसल्याचेही यात नमूद करण्यात आलेले आहे. त्यानंतर पारित केलला आदेश हा आयोगाने केलेली सूचना असून त्याचा विचार करण्याची, त्यानुषंगाने कार्यवाही करण्याची सूचना ही महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ (म्हाडा) यांना दिलेले आढळून येते. प्रस्तुत प्रकरणी या स्वरुपाचे अर्ज, अपील अर्ज, तक्रार अर्ज हे अनेक प्राधिकारणाकडे या आधि देखील केले असून यावर याआधिच प्रतिसाद देखील देण्यात आलेला आहे. तक्रारकर्ता यांना सादर केलेल्या लेखी युक्तीवादात म्हाडा मुंबई,



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

नागपूर, औरंगाबाद यांनी ज्या अर्जदाराचे नावे घर भुखंडे आहेत, अशा अर्जदारांचे अर्ज व गाळावाटप देखील रद्द केले असून असेच नियम अमरावती यांना सुध्दा लागू असल्याने अशा प्रकारच्या अपात्र अर्जदारा विरुध्द म्हाडा अमरावती यांनी त्यांचे निदर्शनास ही बाब आल्यानंतरही अनुसरण्यात येणारी कार्यवाही किंवा कार्यपध्दती याचा कुठलाच खुलासा केला नसल्याचे नमूद केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी द्वितीय अपील क्र. १०८९/२०१४ यातील दि.२८.०७.२०१६ रोजी पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने जर महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ (म्हाडा) प्राधिकरण यांनी अशा प्रकारची पात्र व अपात्र उमेदवारांची माहिती उपलब्ध असल्यास तात्काळ प्रदान करण्याच्या सुचनेसह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : १५.०६.२०२३**

जावक क्रमांक 4028 दिनांक 15 JUL 2024

निर्गमित केले
15 JUL 2024